# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

## Date – 13 December 2024

## Time 01.00 to 01.05 PM

## Language Marathi

## आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर

## प्रादेशिक बातम्या

## दिनांक १३ डिसेंबर २०२४ दुपारी १.०० वा.

****

लोकसभेत आज संविधानावर चर्चेला सुरुवात झाली. देशानं राज्यघटना स्वीकारली त्या घटनेला ७५ वर्षं पूर्ण होत असल्यानिमित्त ही विशेष चर्चा होत आहे. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी चर्चेला सुरुवात करताना, आपलं संविधान सार्वभौम आणि सक्षम असल्याचं सांगितलं. आपली राज्यघटना सामाजिक, आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक जीवनातल्या सर्व पैलूंना स्पर्श करून राष्ट्र उभारणीचा मार्ग मोकळा करते, असं ते म्हणाले. सरकार संविधानाच्या मूल्यांना केंद्रस्थानी ठेऊन काम करत असून, संविधानात नमूद केल्याप्रमाणे धर्म आणि भावना, याचा आदर करत असल्याचं त्यांनी सांगितलं. संविधान हे राष्ट्र निर्माणाचं, देशाच्या विकासाचं रोल मॉडेल असून, संविधानानंच जनतेला अधिकार दिले असल्याचं सिंह यांनी नमूद केलं. हर घर नल, महिला सशक्तीकरण, सामाजिक न्याय, जीएसटी, नवीन फौजदारी कायदे, नारी शक्ती वंदन अधिनियम यासारख्या सरकार राबवत असलेल्या विविध योजना आणि कायद्यांचा राजनाथ सिंह यांनी उल्लेख केला. संविधान निर्माणात पुरुषांप्रमाणेच काही महिलांचा देखील मोलाचा वाटा होता, असं सांगून राजनाथ सिंह यांनी, या महिलांचा गौरव केला.

दरम्यान, संविधानावरच्या या दोन दिवसीय चर्चेला पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या उत्तर देणार आहेत. राज्यसभेत १६ आणि १७ तारखेला संविधानावर चर्चा होणार आहे.

****

राज्यसभेत सभापतींच्या अविश्वास प्रस्तावावरुन विरोधक आणि सत्ताधाऱ्यांनी केलेल्या गदारोळामुळे सदनाचं कामकाज आजही होऊ शकलं नाही. विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांनी अविश्वास प्रस्तावावर सामाजिक माध्यमावर केलेल्या वक्तव्यावर सभापती जगदीप धनखड यांनी आक्षेप घेतला. या प्रस्तावावर चर्चा करण्याची विरोधी पक्षांची मागणी त्यांनी फेटाळून लावली. सदनात विरोधी पक्षांना

बोलू दिलं जात नसल्याचा आरोप खरगे यांनी केला. यावरुन दोन्ही बाजुच्या सदस्यांनी केलेल्या गदारोळामुळे राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी स्थगित झालं. दरम्यान, सभापती जगदीप धनखड यांनी राज्यसभेत कामकाज होत नसल्याच्या पार्श्वभूमीवर आज दुपारी सर्वपक्षीय बैठक बोलवली आहे.

****

१३ डिसेंबर २००१ रोजी संसदेवर झालेल्या हल्ल्याचा आज २३ वा स्मृतिदिन आहे. या दहशतवादी हल्ल्यात प्राण गमावलेल्या सुरक्षा जवानांना आणि पीडितांना देशभरातून आदरांजली अर्पण केली जात आहे.

लोकसभा आणि राज्यसभेत आज संसद दहशतवादी हल्ल्यातल्या हुतात्म्यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. संसदेच्या सुरक्षा रक्षकांनी धैर्य आणि शौर्य दाखवून दहशतवाद्यांचा कट हाणून पाडला, असं सांगून लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी दहशतवादाशी खंबीरपणे लढण्याच्या संकल्पाचा पुनरुच्चार केला. राज्यसभेत यासंदर्भात बोलताना सभापती जगदीप धनखड यांनी, हा दिवस राष्ट्रीय सुरक्षेसमोरील आव्हानांना तोंड देताना दक्षतेची आणि एकतेची गरज दर्शवत असल्याचं नमूद केलं.

उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला, विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह इतर केंद्रीय मंत्री, खासदारांनी आज संसद भवनात हुतात्म्यांना पुष्पांजली अर्पण केली.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी आज उत्तर प्रदेशातल्या संगमनगरीच्या दौऱ्यावर असून, १३ जानेवारी २०२५ पासून सुरू होणाऱ्या महाकुंभ सोहळ्याचं त्यांच्या हस्ते औपचारिक उद्घाटन होत आहे. यावेळी सात हजार कोटींच्या महाकुंभ प्रकल्पाचं उद्घाटनही होत असून, यात दहा उड्डाणपूल, घाट आणि नदीकाठच्या रस्त्यांचा समावेश आहे. भारद्वाज आश्रम कॉरीडॉर, श्रींगवेरपूर धाम कॉरडॉर, अक्षव्यत कॉरीडॉर, हनुमान मंदिर कॉरीडॉर यांचंही उद्घाटन पंतप्रधान करणार आहेत.

****

येत्या युवा दिनी अर्थात १२ जानेवारी रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातल्या शिर्डी इथं भारतीय जनता पक्षाचं प्रदेश अधिवेशन होणार आहे. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मुंबईत ही माहिती दिली. भाजपचे राष्ट्रीय अध्यक्ष जे. पी. नड्डा, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्या प्रमुख उपस्थिती होणाऱ्या या प्रदेश अधिवेशनाला १० हजार भाजप पदाधिकारी, तरूण कार्यकर्त्यांची उपस्थिती असेल,

असं बावनकुळे म्हणाले. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त येत्या काळात तरूणाईला भाजपकडे आकर्षित करण्यासाठी अभियान सुरू करण्यात येणार असल्याचंही त्यांनी सांगितलं.

****

बीड जिल्ह्यातल्या मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या अपहरण आणि हत्या प्रकरणातल्या आरोपींना तत्काळ अटक करावी, या प्रकरणाची सीआयडी मार्फत चौकशी करावी अशी मागणी लातूर इथल्या सकल मराठा समाजाच्या वतीने करण्यात आली आहे. या मागणीचं निवेदन काल लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आलं.

****

'एक देश एक विद्यार्थी ओळख' या संकल्पनेतून राबवण्यात येणाऱ्या 'अपार' नोंदणीत सिंधुदुर्ग जिल्ह्यानं राज्यात पहिला क्रमांक राखला आहे. अहिल्यानगर जिल्हा दुसऱ्या स्थानावर तर रत्नागिरी जिल्हा तिसऱ्या क्रमांकावर आहे. सिंधुदुर्ग जिल्ह्यात आठ लाख १९ हजार ९५ विद्यार्थ्यांची म्हणजेच ९० टक्क्यांहून अधिक 'अपार' नोंदणी पूर्ण झाली आहे.

****

मस्कत इथं सुरु असलेल्या महिला कनिष्ठ हॉकी आशिया चषक स्पर्धेत भारताचा उपान्त्य फेरीतला सामना उद्या जपान सोबत होणार आहे.

****